**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन आदेश क्रमांक : एफएसटी-०७/१७/प्र.क्र.४२५/फ-४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३ नोव्हेंबर, २०१७.

**पहा :-** १) शासनाचे समक्रमांकित पत्र दि.१४.०९.२०१७
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष १०(१)/आस्था/एक/प्र.क्र.(१७-१८)/२७१ दि. १०/१०/२०१७

**शासन आदेश :**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार व सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने वन विभागातील वनक्षेत्रपाल, गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या महसूली विभाग वाटपानंतर बदलीने पदस्थापना खाली दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे:-

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व सद्याची पदस्थापना | बदलीनंतरची पदस्थापना | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | श्री.अशोक दत्तात्रय खाडे लागवड अधिकारी, गडचिरोली (सा.व.वि. गडचिरोली) | वनक्षेत्रपाल, (सामा.वनी.), कोरेगाव साववि, सातारा | बदली अधिनियमातील कलम ४(४) (एक) (दोन) व ४(५) नुसार रिक्त पदी |
| २ | श्री.रमेश किसन रसाळ वनक्षेत्रपाल, सा.व, सावंतवाडी सा.व.वि. सिंधुदुर्ग | वनक्षेत्रपाल (प्रा.), पश्चिम मुरबाड, वनविभाग ठाणे | बदली अधिनियमातील कलम ४(४) (एक) (दोन) व ४(५) नुसार रिक्त पदी |
| ३ | श्री.प्रमोद सदाशिव ठाकर वनक्षेत्रपाल, सहायक निर्देशक-१, कुंडल विकास, जि.सांगली | वनक्षेत्रपाल (जकास), निर्देशन विभाग, ठाणे | बदली अधिनियमातील कलम ४(४) (एक) (दोन) व ४(५) नुसार रिक्त पदी |

२. उपरोक्त अधिकाऱ्यांच्या रिक्त झालेल्या पदावर नियंत्रक अधिकाऱ्यांनी रिक्त पदाचा कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्याची कार्यवाही करावी.

३. सदर पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यास नियंत्रक अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यास तात्काळ कार्यमुक्त करावे.

तसेच, संबंधित अधिकाऱ्यांना नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले, याबाबत संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी शासनास nitin.kshirsagar@nic.in या ई-मेल संकेतस्थळावर त्वरीत कळवावे.

४. संबंधित अधिकाऱ्यांना शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जाची दखल घेण्यात येणार नाही.

५. सदरहू बदली आदेशानुसार तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारे असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१७११०३१८०९५८५८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Atul Ashok Kode
Date: 2017.11.03 18:00:15 +05'30'

**(अतुल कोदे)**
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

**प्रति,**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपूर/कोल्हापूर/ठाणे
४. महासंचालक कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन, प्रबोधिनी (वने), कुंडल, जि.सांगली
५. महालेखापाल,महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र २, नागपूर
६. जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, सातारा/ठाणे/गडचिरोली/सिंधुदुर्ग/सांगली
७. मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
८. मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
९. सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
१०. संबंधित अधिकारी / प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा.नागपूर यांचे मार्फत
११. वन विभागातील सर्व कार्यासने
१२. निवड नस्ती (फ-४ कार्यासन).